दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ५२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१६ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## काँग्रेस नेते राजीव सातव यांना 'सायटोमेगँलो व्हायरस' या नव्या विषाणूची लागण

**दै.रायगड नगरी । पुणे**

पुणे: काँग्रेसचे राज्यसभा खासदार राजीव सातव यांच्या प्रकृतीत शुक्रवारी रात्री अचानक खालावली. डॉक्टरांनी त्वरीत औषधोपचार सुरू केले. शनिवारी दिवसभरात सुधारणा होत असल्याचे सांगण्यात आले. कोरोनाबाधित झाल्याने सातव जहांगीर रूग्णालयात दाखल आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वीच कोरोनावर मात देखील केली होती. मात्र सातव यांना 'सायटोमेगँलोव्हायरस' या नव्या विषाणूची लागण झाली असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले आहे. गेल्या १५ दिवसांपासून राजीव सातव यांच्यावर पुण्यातील जहाँगिर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. औषधांना ते योग्य प्रतिसाद देत असल्याचे त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. सत्यपालसिंग यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे चांगली सुधारणा होत होती. ते आता धोक्याबाहेर असल्याचे बोलले जात होते असे असताना शुक्रवारी रात्री अचानक त्यांची तब्येत बिघडली.

# तौत्के चक्रीवादळाचा मुंबईला धोका नाही; सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस बरसणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**तौत्के चक्रीवादळाचा मुंबई शहराला धोका नाही. हे चक्रीवादळ मुंबईनजीकच्या समुद्रातून जाणार असल्याने त्याच्या प्रभावाने मुंबईत पाऊस होण्यासह वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याचे भारतीय हवामान खात्याने आज मुंबई महापालिकेत झालेल्या बैठकीत स्पष्ट केले आहे.**

आज मुंबईतील वाऱ्याचा वेग हा ताशी चाळीस ते पन्नास किमीपर्यंत जाऊ शकतो तर आज (रविवारी) १६ मे रोजी सायंकाळपासून वाऱ्याचा वेग वाढून तो ताशी ६० किमीपर्यंत जाऊ शकतो. काही ठिकाणी हा वेग ताशी ८० किमीपर्यंतही जाऊ शकेल, अशी माहिती या बैठकीदरम्यान भारतीय हवामान खात्याद्वारे देण्यात आली आहे. त्याचवेळी पावसाचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईत त्याबाबत खबरदारी घ्यावी लागणार असून त्यासाठी महापालिका यंत्रणा सज्ज झाली आहे.

मुंबईला वादळाचा धोका नसला तरी वादळी वारे वाहणार असल्याने व पावसाची शक्यता असल्याने नागरिकांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. नागरिकांनी आज व उद्या घरातच राहावे. अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडू नये. समुद्र किनारी जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईत रस्त्याच्या कडेला वा वस्तीत धोकादायक स्थितीत होर्डिंग असल्यास ते हटवण्याची सूचनाही संबंधितांना देण्यात आली आहे.

## पनवेलमध्ये विनाकारण फिरणाऱ्यांची अँटीजेन व आरटीपीसीआर चाचणी

### पॉझिटिव्ह चाचणी आलेल्या व्यक्तींना इंडिया बुल कोविड सेंटरमध्ये रवाना करणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याचे दिसून आले. मात्र प्रशासनाने केलेल्या उपाययोजना आणि विविध निर्बंधांमुळे मागील काही दिवसांपासून कोरोनाचा संसर्ग काही प्रमाणात आटोक्यात आल्याने समाधानकारक परिस्थिती पाहायला मिळत आहे. परंतु असे असले तरीही अजूनही काही नागरिक विनाकारण इतरत्र ठिकाणी फिरताना दिसून येत आहेत. पनवेलमध्ये अशा नागरिकांची अँटीजन आणि आरटीपीसीआर चाचणी करण्यात येत आहे. पॉझिटिव्ह चाचणी आलेल्या नागरिकांची इंडिया बुल कोविड सेंटरमध्ये रवानगी करण्यात येणार आहे. शनिवारी पनवेल शहरातील उरण नाका, ठाणा नाका, करंजाडे परिसर याठिकाणी सदरची कारवाई महापालिका आणि पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आली. यावेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते. तसेच महापालिकेच्या आरोग्य विभागाचे डॉक्टर्स आणि कर्मचारी हे देखील उपस्थित होते.



फेब्रुवारी महिन्यापासून पुन्हा एकदा नव्याने निर्बंध लागू करण्यात आले. तेंव्हापासून मागील २ महिन्यांमध्ये पनवेल महापालिका आणि पोलीस प्रशासन तसेच ग्रामीण भागात महसूल प्रशासन यांच्यासोबत एकत्रितरीत्या कारवाई करण्यात येत आहे. संचारबंदीदरम्यान नियमांचे उल्लंघन करणारे नागरिक तसेच आस्थापनांवर देखील कारवाई करण्यात येत आहे. परिमंडळ-२ क्षेत्रात मागील महिन्यात सुमारे ३५ हजार नागरिकांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये मास्क न वापरणाऱ्या साडेपाच हजार नागरिकांवर कारवाईचा बडगा उगरण्यात आला. त्याचप्रमाणे सोशल डिस्टन्सिंगचे पालन न करणे आणि आस्थापनांच्या निगडित असलेले निर्बंध न पाळणे तसेच ई-पास नसतानाही विनाकारण वाहने घेऊन फिरणाऱ्या नागरिकांवर देखील कारवाई करण्यात आली आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत ओसरलेली रुग्णसंख्या पुन्हा एकदा वाढू लागली. त्यामुळे राज्य सरकारने पुन्हा एकदा लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला. लॉकडाऊन आणि विविध निर्बंध लागू केल्यानंतर काही प्रमाणात कोरोना रुग्णांच्या संख्येत घट दिसून आली. परंतु अजूनही कोरोनाची साखळी पूर्णपणे तुटलेली नाही त्यामुळे राज्यशासनाने १ जुन ला सकाळी ७ वाजे पर्यंत लॉकडाऊनची मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पनवेलमध्ये मागील काही दिवसांमध्ये कोरोना रुग्णांच्या संख्येत काही प्रमाणात घट पडली असल्याने कोरोनाची लाट ओसरली असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे विनाकारण बाहेर फारणाऱ्या नागरिकांचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. बहुतांश नागरिक औषधे आणायला जात असल्याचे खोटे कारण सांगून ७ ते ११ या वेळेनंतरही बाहेर पडत असल्याचे दिसून येत आहे. करंजाडे परिसरात अनेक मेडिकल स्टोअर्स असून देखील त्याठिकाणीचे नागरिक

..../२

> अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांनी देखील कोरोना चाचणी करणे आवश्यक आहे. जेणेकरून अत्यावश्यक सेवा देताना त्यांच्यापासून इतरांना संसर्ग होणार नाही. नागरिकांनी वैद्यकीय अथवा अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर पडणे टाळावे. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी पनवेल महानगरपालिका, पोलीस प्रशासन देखील विविध उपाययोजना राबवत आहे. यासाठी कोरोनाचे सर्व नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल.
>
> **- अजयकुमार लांडगे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे)**

## अश्विनी बिद्रे हत्या प्रकरण ; आरोपींचा जामिनासाठी अर्ज

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे हत्याकांडातील आरोपी अभय कुरुंदकर व अन्य आरोपींनी कोरोना असल्याने आम्हाला जामीन देण्यात यावे याकरिता पनवेल सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला आहे. या जामीन अर्जावर येत्या दि.२४ मे रोजी सुनावणी होणार आहे.



कोरोना मुळे अनेक कैद्यांना जेलमधून पॅरोलवर सोडण्यात आले आहे. यासाठी अश्विनी बिद्रे हत्याकांडातील आरोपी अभय कुरुंदकर, राजेश पाटील, कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर यांनी पनवेल सत्र न्यायालयाकडे जामिनासाठी अर्ज केला आहे.

अभय कुरुंदकर यांच्या पत्नीचे मध्यंतरी निधन झाले. त्यावेळी आपल्याला पॅरोलवर सोडावे अशी विनंती कुरुंदकर याने केली होती. मात्र न्यायालयांनी ती मान्य केली नाही.

अश्विनी बिद्रे हत्याकांडाच्या खटल्यावर कोरोना महामारीचा परिणाम होऊ नये यासाठी या खटल्याची सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घ्यावी, अशी विनंती विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी न्यायालयाला केली आहे.

## संक्षिप्त...

### उल्हासनगरात इमारतीचा स्लॅब कोसळला; ४ ठार

**दै.रायगड नगरी । ठाणे**

ठाणे:उल्हासनगर येथील कॅम्प १ भागात मोहिनी पॅलेस इमारतीचा स्लॅब कोसळून भीषण दुर्घटना घडली आहे. याबाबत माहिती मिळताच अग्निशमन दल, महापालिकेचे पथक आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

मोहिनी पॅलेस ही तळ अधिक चार मजल्यांची इमारत असून या इमारतीचा स्लॅब दुपारी १ वाजून ४० मिनिटांच्या सुमारास कोसळून ढिगाऱ्याखाली जवळपास १५ रहिवाशी अडकले होते. त्यातील ११ जणांना सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश आले आहे. त्यातील दोन जण जखमी आहेत. ढिगाऱ्याखाली आणखी चार जण अडकले होते. या चारही जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मिलिंद पार्शे (१२), ऐश्वर्या हरिश दोडवाल (२३) हरिश दोडवाल (४०), सावित्री पार्शे (६०) अशी मृतांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, चौथ्या मजल्यावरील स्लॅब कोसळून ही दुर्घटना घडली आहे. ही इमारत अनधिकृत असून १९९४ पासूनचे हे बांधकाम आहे. हे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यानेच ही दुर्घटना घडल्याची शक्यता पालिका प्रशासनाने व्यक्त केली आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच पालिका आयुक्त राजा दयानिधी तसेच स्थानिक आमदार कुमार आयलानी घटनास्थळी दाखल झाले आहेत.

## तौत्के चक्रीवादळापूर्वीच पोलादपूर-महाड दरम्यान वादळ अन् पाऊस

### अक्षय्य तृतीयेच्या संध्याकाळी अनेक छप्परांवरील पत्र्यांचा क्षय



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात तौत्के चक्रीवादळ पोहोचण्यापूर्वीच शुक्रवारी सायंकाळी वादळीपाऊस सुरू झाला. पोलादपूर तालुक्यातील धारवली, भोराव माटवण रस्ता आणि महाड तालुक्यातील राजेवाडी मोहल्ल्यातील मदरसा या भागात घरे आणि छप्परांचे वादळीवाऱ्यामुळे नुकसान झाले. मात्र, तौत्के चक्रीवादळापूर्वीच्या या वादळी परिस्थितीची पोलादपूर तालुक्यातील प्रशासनाला कोणतीही माहिती नसल्याचे दिसून आले.

पोलादपूर तालुक्यात अक्षय्य तृतीयेच्या संध्याकाळी सोसाट्याचा वारा सुरू झाला आणि अनेक नारळाच्या झावळ्या तसेच घरांच्या छप्परांचे पत्रे उडून फूटले. स्टिलच्या पत्र्यांनीदेखील हवेत तरंगत जमिनीवर आदळून मोठ्याने कर्कश्य आवाज केले. वाऱ्याचे घोंघावणे वादळाची पूर्वकल्पना देत असताना पक्ष्यांनादेखील वाऱ्याच्या विरोधात आपल्या निवाऱ्याकडे हवेतून संचार करण्यात अडथळा होत असल्याचे दिसून आले. पोलादपूर तालुक्यातील भोराव माटवण रस्तालगतच्या विजेच्या काँक्रीटच्या खांबाचा कनेक्टर्स जोडलेला भाग तुटून लोंबत असल्याचे दिसून आले तर काही ठिकाणी झाडाच्या फांद्या तुटून रस्त्यावर कोसळल्याने वाहतूकीला अडथळा झाला. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगतच्या

..../२

## कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्राची संख्या वाढवा ; आ.प्रशांत ठाकूर यांची आरोग्यमंत्र्यांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कोरोना बाधित रूग्णांची संख्या लक्षात घेता कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्राची संख्या वाढविण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी नामदार राजेश टोपे यांना निवेदन दिले आहे. त्यांनी निवेदनात म्हंटले आहे कि, संपूर्ण भारतात कोविड १९ महामारीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रभावी शस्त्र म्हणून कोव्हॅक्सिन व कोव्हिशिल्ड या औषधांचे लसीकरण करण्याची सुरूवात झालेली आहे. कोव्हिड १९ या महामारीला प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सदर औषधांच्या लसीकरणाचे एक कवच सर्व भारतीयांना प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रात आणि पर्यायाने पनवेल महानगरपालिका हद्दीतही लसीकरण मोहिम सुरू झाले आहे.

महाराष्ट्राबरोबरच पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या मनात सदर लस घेतली तर आपल्याला कोरोना होणार नाही अशी भावना मोठया प्रमाणात निर्माण झाली आहे. त्यामुळे मोठया संख्येने नागरिक लसीकरण केंद्रावर लसीकरणासाठी तासन्तास उभे राहून गर्दी करत आहेत. त्यामुळे सोशल डिस्टसिंगच्या नियमांचे उल्लंघन होत असून कोरोनाचा प्रादुर्भाव अधिकच वाढणार आहे. त्यामुळे लसीकरण केंद्रावर नागरिकांची मोठया प्रमाणात होणारी गर्दी व कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिका हद्दीत लसीकरण केंद्रांची संख्या वाढविण्यासंदर्भात संबंधितांना आदेश व्हावेत, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे.

## महावितरणाचे पितळ अवकाळी पावसाने केले उघड ; शहर अंधारात, नागरिक हैराण

**दै.रायगड नगरी । तळा**

शुक्रवारी अवकाळी पावसाच्या सरी येण्यास सुरुवात होताच लोक काहीसे सुखावले होते. पण महावितरणने ते काही मिनिटांतच हिरावून घेतले. तळा शहर आणि ग्रामीण भागात रात्री आणि दिवसा वीजपुरवठा सातत्याने खंडीत होत होता. रात्री दहा वाजेपासून विजेचा लपंडाव सुरू झाला. तो शनिवारी दुपार पर्यंत कायम होता. लाखो ग्राहकांना रात्र अंधारात काढावी लागली. उकाडा, डासांच्या उपद्रवामुळे झोपेचा चक्काचूर झाला. महावितरणने पावसाळ्यात अखंडित वीजपुरवठा करण्याचे अशवासन आताच फोल ठरले आहे. एवढेच नव्हे, विजेचा रात्रभर लपंडाव सुरू राहिल्याने नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला.

रात्री एकनंतर लाईट आली परंतु पुन्हा सकाळी अनेक भागांत वीज गायब झाली होती. पहिल्याच पावसाने महावितरणाचे पितळ उघडे केले आहे. सुरवातीला फॉल्ट सापडला नाही नंतर पढवण लाईन येथे मेजर फॉल्ट असल्याने लाईट नव्हती असे समजते कर्मचारी आणि अधिकारी यांनी रात्रभर मेहनत घेत लाईन सुरु केली.

परंतु दुपारी पुन्हा लाईट गेल्याने नागरिकांची गैरसोय झाली त्यामुळे विजेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असुन तालुक्याला स्वतंत्र वीजपुरवठा मिळाल्या नंतरच शहर आणि ग्रामीण भागात विज पुरवठा सुरळीत होईल असे बोलले जात आहे. विज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने अनेक भागांत पाणी पुरवठा करता आलेला नाही.

## जेएनपीटी सेझमधील तीन कंपन्यांचे प्लॉटचे अॅलॉटमेंट तडकाफडकी रद्द

**दै.रायगड नगरी । उरण**

सुमारे पाच हजार कोटी गुंतवणूकीतुन आणि २७७ हेक्टर क्षेत्रावरील तयार करण्यात येणाऱ्या जेएनपीटीच्या महत्वाकांक्षी स्पेशल इकॉनॉमिक झोन मध्ये तीन कंपन्यांचे लिजवर दिलेले प्लॉटचे अॅलॉटमेंट तडकाफडकी रद्द करण्याची कारवाई केली आहे.

जेएनपीटीच्या २७७.३८ हेक्टर जमिनीवर देशातील पहिलेच सर्वात मोठे स्पेशल इकॉनॉमिक झोन (जेएनपीटी सेझ) उभारण्यात येत आहे. गुंतवणूक, पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या सुधारणा आणि जागतिक बाजारपेठेत अधिकाधिक प्रवेश मिळाल्यामुळे गेल्या काही वर्षांत सागरी उद्योगात झपाट्याने वाढ झाली आहे. मल्टि-प्रॉडक्ट बंदर आधारित जेएनपीटी सेझचे उद्दीष्ट सागरमाला अंतर्गत बंदर-आधारित औद्योगिकीकरण सक्षम करून निर्यातीला चालना मिळाली आहे. या सेझमध्ये २१ सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) आणि एका मुक्त व्यापार वेरहाउसिंग झोनला (एफटीडब्ल्यूझेड) आतापर्यंत भूखंड वितरित करण्यात आले आहेत. ई-टेंडर व्दारे लिलाव प्रक्रिया पूर्ण केली असुन जेएनपीटीने २४ जुन २०२० पासून सेझ सुरू करण्याची घोषणाही केली आहे.

जेएनपीटी एसईझेड पूर्ण क्षमतेने विकसित व कार्यान्वित झाल्यावर जेएनपीटी-सेझमध्ये पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.त्यामुळे या सेझमध्ये ५७ हजार प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. शिवाय दीड लाख अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या एसईझेड प्रकल्पासाठी जेएनपीटीला विशेष योजना प्राधिकरणाचा (एसपीए) दर्जा देखील देण्यात आला असल्याची माहिती जेएनपीटीचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली आहे. दरम्यान जेएनपीटी सेझमध्ये ई-टेंडर व्दारे २०१८ मध्ये मेसर्स.एस.एस.क्लच मॅनफॅक्चरींग कंपनी प्रा.लि.,मेसर्स.स्पायरेज सिलिंग सोल्युशन प्रा.लि., मेसर्स. देवी मरीन फूड एक्सपोर्ट प्रा.लि. या तीन कंपन्यांना प्लाट लाटमेंट

..../२

# सरत्या शैक्षणिक वर्षाचे धडे

सरते शैक्षणिक वर्ष (२०२०-२१) कोव्हिडच्या सावटाखालीच गेले. हे वर्ष सुरू झाले, त्यावेळी करोनाची पहिली लाट होती आणि संपत असताना आता दुसरी लाट शिखरावर आहे. ती ओसरेपर्यंत नवीन शैक्षणिक वर्ष (२०२१-२२) सुरू होईल आणि त्याचा सुरुवातीचा काही साथरोगाच्या छायेखालीच जाण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष कसे गेले, ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने कसे शिकविले गेले, कोणकोणते उपक्रम राबविले गेले, विद्यार्थी-शिक्षक यांमधील संवाद कसा झाला, ऑनलाइन अध्यापन कितपत प्रभावी होते, ऑनलाइन आशय पुरेसा आणि प्रस्तुत होता का, सहाध्यायींकडून होत असलेले शिक्षण यावेळी झाले का आदी अनेक प्रश्नांची उत्तरे प्रामाणिकपणे शोधण्याची गरज आहे. साथरोगाच्या छायेखाली शिक्षण सुरू ठेवण्याची अलीकडच्या काळातील ही पहिलीच वेळ असल्याने त्यामध्ये झालेल्या चुका, दोष जाणून घेतल्यास येत्या शैक्षणिक वर्षात दुरुस्ती केल्यास शिक्षण अधिक परिणामकारक होऊ शकेल. त्यामुळे या वर्षीच्या शैक्षणिक वर्षाबाबत होत असलेल्या पाहण्या आणि अभ्यास यांना गांभीर्याने घ्यायला हवे. शाळा, शिक्षक, विद्यार्थी या साऱ्यांच्या संख्या देशात मोठी असल्याने, तसेच भूगोलापासून वैविध्य असल्याने एकच एक देशव्यापी पाहणी करण्यात अडचणी आहेत; तथापि या वर्षभरात सरकारी यंत्रणांनी, तसेच विविध स्वयंसेवी संस्थांनी आणि शिक्षकांच्या संघटनांनीही काही पाहण्या केल्या. त्यांमधील निरीक्षणे आणि निष्कर्ष वर्षभरातील शिक्षण प्रक्रिया समजून घेण्यास उपयुक्त आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) केलेली पाहणीही याच प्रकारची असून, तिचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. कोव्हिडचा सर्वाधिक फटका बसलेल्या राज्यांपैकी एक असल्याने महाराष्ट्रात संपूर्ण वर्षभर शाळा सुरू नव्हत्या. गेल्या वर्षी पहिली लाट ओसरल्यानंतर राज्याच्या काही भागांत काही काळ शाळा सुरू झाल्या हे खरे; परंतु करोनाची रुग्णसंख्या परत वाढू लागताच त्या बंद कराव्या लागल्या. त्यामुळे ऑनलाइन पद्धतीनेच शाळा सुरू ठेवाव्या लागल्या. स्मार्ट मोबाइल, कम्प्युटर, इंटरनेट, अखंडित वीज पुरवठा या सुविधा नसलेल्या विद्यार्थ्यांना या पद्धतीमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागले; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागांतील अनेक शिक्षकांनी वाड्या-वस्त्यावर जाऊन, विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन शिक्षणाची प्रक्रिया सुरू ठेवल्याची उदाहरणेही आहेत. गावातील मंदिरावरील लाउडस्पीकरवरून अभ्यास घेण्याच्या घटनाही घडल्या. अशा कर्तव्यदक्ष शिक्षकांच्या उपक्रमांमुळे अध्यापन-अध्ययन सुरू राहू शकले. या वर्षभरात कोणत्या पद्धतीने शिक्षण दिले गेले, कोणते उपक्रम राबविले गेले, ऑनलाइन वर्ग कसे भरले, चाचण्या कशा घेतल्या गेल्या यांची पाहणी 'एससीईआरटी'ने केली आहे. अर्थात, त्यासाठी शाळांना माहिती देणे गरजेचे होते. त्यामुळे शाळांकडून आलेल्या माहितीच्या आधारेच पाहणीचे निष्कर्ष असणार. तरीही हे निष्कर्ष गेल्या वर्षातील राज्यामधील एकूण शालेय शिक्षणावर प्रकाश टाकणारे आहेत. ऑनलाइन शिक्षणाला अनेक प्रकारे मर्यादा असल्या, तरी मुंबई, पुणे या महानगरांच्या तुलनेत राज्याच्या ग्रामीण भागांत ऑनलाइन उपक्रम अधिक प्रमाणावर राबविले गेले, असे निरीक्षण या पाहणीने नोंदविले. पुण्यात ४० टक्के आणि मुंबईत ४५ टक्के शाळांनी ऑनलाइन उपक्रम राबविले. त्या तुलनेत नंदुरबार (७२ टक्के), नगर (६९ टक्के), सांगली (६५ टक्के) आणि कोल्हापूर (६२.७ टक्के) यांनी अधिक प्रमाणात उपक्रम राबविले. अशा प्रकारे त्यांनी मर्यादांवर मात करण्याची क्षमता दाखवून दिली. ऑनलाइन वर्ग, चाचण्या, व्हाटसअॅपवरून अभ्यास यांखेरीज प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन चाचण्या घेणे, कार्यपुस्तिका भरून घेणे आदी गोष्टी केल्या गेल्या. आपल्या शिक्षण व्यवस्थेत अनेक दोष असले, तरी शिक्षणाबद्दल आस्था असलेले शिक्षक कमी नाहीत हे यातून स्पष्ट दिसते. महानगरांच्या तुलनेत ग्रामीण भागात अधिक प्रतिसाद मिळण्याची कारणे शोधायला हवीत. मोठ्या शहरांत खासगी शाळा मोठ्या संख्येने असल्याने तेथील सरकारी शाळांवर काही वेगळा परिणाम होतो का, यावरही या निमित्ताने प्रकाश पडू शकेल. या पाहणीचा अहवाल 'एससीईआरटी' सरकारला सादर करणार आहे. मात्र, कालांतराने तो खुलाही करायला हवा. त्याचबरोबर पुढील शैक्षणिक वर्षासाठी काय धडे घेता येतील हेही यातून पाहायला हवे. कोव्हिडची साथ कायम राहिल्यास येत्या शैक्षणिक वर्षातही ऑनलाइन वर्ग घ्यावे लागतील. यंदा ज्या सुविधांच्या अडचणी निर्माण झाल्या, त्या दूर करायला हव्यात. वंचित विद्यार्थ्यांना स्मार्ट फोन पुरविण्यापासून माध्यान्ह भोजन देण्यापर्यंत आणि ऑनलाइन आशय सकस करण्यापासून नियमित मूल्यांकनापर्यंत अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास आणखी महिन्याभराचा अवधी आहे. त्याचा उपयोग करून संपूर्ण तयारी करावी लागेल. तरच नव्या वर्षातील शिक्षण अधिक उपयुक्त होईल. अन्यथा 'मागच्या पानावरून पुढे चालू' अशी स्थिती होईल.

# कोरोना काळात दिवेआगर पॅटर्न राबवण्याची गरज



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या दिवेआगर ग्रामपंचायतने कोरोना संसर्ग रोखण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. ब्रेक द चेन अंतर्गत संपूर्ण गावाचे सर्वेक्षणसोबत समुपदेश व जनजागृती करण्यात येत आहे.

मागील दोन दिवसात दिवेआगर गावातील कोविड पॉजिटीव्ह रुग्णांची वाढ होत आहे. व त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा विचार करून ब्रेक द चेन मोहिमे अंतर्गत ग्रामपंचायतकडून संपूर्ण गावाचे सर्वेक्षण तसेच समुपदेश व जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये ऑक्सिजन लेव्हल, पल्स रेट तपासणी करूण्यास गावातील प्रत्येक कुटुंबाला भेट देत आहे.

काम नसताना नागरिकांनी बाहेर पडू नये, तसेच जेष्ठ नागरिक आणि लहान मुलांनी घरीच राहावे. या बिकट परिस्थितीत खचून न जाता आपण आजारावर यशस्वीपणे मात करू शकतो याची जाणीव मनात निर्माण करण्याचे काम दिवेआगर ग्रामपंचायत करत आहे.

समुपदेश व जनजागृती करणाऱ्या या कोरोना पथकामध्ये सरपंच उदय बापट, विस्तार अधिकारी किशोर नागे, दिघी सागरी ठाण्याचे उपनिरीक्षक कर्मराज गावडे, प्राथमिक शिक्षक, आशा स्वयंसेविका व ग्रामपंचायत सदस्य यांनी पुढाकार घेतला आहे.

दिवेआगर येथे कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे हा संसर्ग वाढू नये यासाठी विविध निर्बंध घालण्यात आले आहेत. ग्रामपंचायत क्षेत्रात आवश्यक त्या उपाययोजना तातडीने हाती घेण्यात आल्या. स्थानिक प्रशासनाने समुद्रकिनारी तसेच गावातून विना मास्क फिरणाऱ्यावर कारवाई सुरु केली आहे. त्यांच्याकडून ८४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# इविनिंग वॉकसाठी गेलेल्या नागरिकांवर पनवेल शहर पोलिसांची कारवाई

## ९५ नागरिकांवर केलेल्या कारवाईत ३३ हजारांचा दंड वसूल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाची साखळी तोडण्यासाठी राज्य सरकारने पुन्हा एकदा लॉकडाऊनची मुदत १ जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे. लॉकडाऊन आणि प्रशासनाने लागू केलेल्या विविध निर्बंधांमुळे मागील काही दिवसांपासून पनवेलमध्ये कोरोनाचा संसर्ग ओसरत असल्याने कोरोना रुग्णांच्या संख्येत देखील घट पडत असल्याचे दिसून येत आहे. संचारबंदीदरम्यान वैद्यकीय आणि अत्यावश्यक सेवेतील नागरिकांना सेवा देण्याची मुभा देण्यात आली आहे. परंतु अत्यावश्यक कारणाशिवाय विनाकारण फिरणारे नागरिक आणि विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांनावर कारवाईचा बडगा सुरूच आहे. पनवेलमध्ये कोरोनाचा संसर्ग काही दिवसांपासून कमी होत असला तरीही कोरोनाची साखळी पूर्णपणे तोडण्यासाठी



नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांनी इतरत्र न फिरता घरात राहण्यासाठी वेळोवेळी प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे. तरीदेखील काही नागरिक मॉर्निंग वॉक आणि इविनिंग वॉकसाठी बाहेर फिरताना आढळून येत आहे. पनवेल शहरातील काही ठिकाणी इविनिंग वॉक साठी फिरणाऱ्या नागरिकांवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

शहरातील ठाणा नाका, कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी परिसर मार्ग, जेएनपीटी मार्ग , करंजाडे तसेच आदी ठिकाणी इविनिंग वॉक तसेच विनाकारण फिरणाऱ्या एकूण ९५ नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण साधारण ३३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. कोरोनाचा संसर्ग कमी होत असला तरीही अजूनही पूर्णपणे कोरोनामुक्ती झालेली नाही. यासाठी सर्व नागरिकांनी कोरोनाच्या नियमांचे पालन करावे. वैद्यकीय अथवा अत्यावश्यक कारणाशिवाय विनाकारण फिरणे टाळावे जेणेकरून कोरोनाची साखळी तोडण्यास मदत होईल. अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेलमध्ये विनाकारण फिरणाऱ्यांची अँटीजेन व आरटीपीसीआर चाचणी

पनवेल शहरात येत असून एका भागातून दुसऱ्या भागात फिरत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे या गोष्टीला पायबंद बसणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना सरकारने कोरोना चाचणी बंधनकारक केली असून त्यांच्या टेस्ट निगेटिव्ह आल्यानंतरच त्यांना बाहेर पडण्याची मुभा आहे. जेणेकरून अत्यावश्यक सेवा देत असताना त्यांच्यापासून इतरांना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्यार नाही.

याचबरोबर विनाकारण मॉर्निंग वॉक व इविनिंग वॉकसाठी बाहेर फिरणाऱ्या नागरिकांची कोरोना चाचणी झालेली नसते त्यामुळे त्यांच्यापासून देखील कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता जास्त असते. या प्रकाराला पायबंद बसावा याकरिता महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकासोबत अशा नागरीकांवर दंडात्मक कारवाईशिवाय त्यांची आरटीपीसीआर आणि रॅपिड अँटिजन टेस्ट करण्याचा निर्णय महापालिका आणि पोलीस प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार आज (शनिवार दि.१५ मे) वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या पथकातील डॉ.अंजली सावंत आणि त्यांचे सहकारी यांनी शहरातील उरण नाका याठिकाणी अत्यावश्यक सेवेव्यतिरिक्त विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांची कोरोना चाचणी केली. शनिवारी सकाळच्या सत्रात विनाकारण फिरणाऱ्या साधारण ६० नागरिकांच्या टेस्ट करण्यात आल्या. यादरम्यान रॅपिड अँटिजन चाचणीमध्ये सगळेजण निगेटिव्ह आले आहेत. मात्र आरटीपीसीआर चाचणीमध्ये कोणी पॉझिटीव्ह आल्याचे आढळल्यास त्यांना इंडिया बुल्स कोविड सेंटर येथे दाखल केले जाणार आहे. यासाठी चाचणी केलेल्या नागरिकांचे दूरध्वनी क्रमांक आणि रहिवासी पत्ते घेऊन ठेवण्यात आले आहेत.

मागील काही दिवसांपासून नागरिकांनी कोरोनाचे नियम पाळल्यामुळे काही प्रमाणात कोरोना रुग्णसंख्येत घट पडली आहे. मात्र असे असले तरीही कोरोनाची साखळी पूर्णपणे तोडण्यासाठी संचारबंदीदरम्यान नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. कोरोना संसर्ग ओसरत असला तरीही काही नागरिक कोरोना पूर्णपणे नाहीसा झाल्याच्या गैरसमजूतीने बाहेर फिरत असल्याचे दिसून येत आहे.

## तौत्के चक्रीवादळापूर्वीच पोलादपूर-महाड दरम्यान वादळ अन् पाऊस

मंडणगड भोर पंढरपूर रस्त्यालगतच्या राजेवाडी गावातील मदरसाच्या लोखंडी पत्र्याची शेड उन्मळून खाली पडली. सुदैवाने कोणालाही इजा-दुखापत झाली नाही.

पोलादपूर तहसिल कार्यालयामधील नैसर्गिक आपत्ती निवारण कक्ष रविवारी होणाऱ्या तौत्के चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर सक्रीय होणार असून अक्षय्य तृतीयेच्या सायंकाळी झालेल्या वादळीवाऱ्यामुळे अनेक ठिकाणी हानी व पडझडीचे पंचनामे अद्याप झाले नसल्याने वादळाबाबत माहिती नसल्याचे नायब तहसिलदार शरद आडमुठे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस सांगितले. यादरम्यान, पोलादपूर तहसिल कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती निवारण कक्ष दरवर्षी केवळ पावसाळ्यातच कार्यरत ठेवण्याची प्रथा असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## जेएनपीटी सेझमधील तीन कंपन्यांचे प्लॉटचे अॅलॉटमेंट तडकाफडकी रद्द

करण्यात आले होते. या तिन्ही कंपन्यांकडे आरएफपी अटीशर्तींचे पालन करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र वारंवार मागणी करूनही या कंपन्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. अशा या आरएफपी अटीशर्तींचे उल्लंघन करणाऱ्या तिनही कंपन्यांचे लिजवर दिलेले प्लॉटचे अॅलॉटमेंट तडकाफडकी रद्द करण्याची कारवाई केली आहे. तसा ठरावच मागील बोर्ड ऑफ ट्रस्टीच्या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली. आता या प्लॉटसाठी नव्याने ई-टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

जेएनपीटी सेझमध्ये चार वर्षांच्या कालावधीनंतरही पायाभूत सुविधा निर्माण करण्यात जेएनपीटी अपयशी ठरली आहे. अपुऱ्या सुविधांमुळेच या तिन्ही कंपन्यांनी जेएनपीटी सेझमधुन अंग काढून घेतले असल्याचा गंभीर आरोप कामगार व काही अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. मात्र कामगार व अधिकाऱ्यांनी केलेले आरोप फेटाळून लावतानाच जेएनपीटी सेझच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे फ्लायओव्हरचे सुरु असलेले ४ टक्के काम वगळता ९६ टक्के पूर्ण झाले असल्याचा दावा उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी केला आहे.

जेएनपीटी सेझमध्ये स्थानिक कंपनी, ठेकेदार, सामाजिक संस्थांना काही प्लाट अग्रोबेस प्रोडक्ट व्यवसायासाठी देण्याची कामगार विश्वस्तांनी मागणी केली होती. या मागणीला तत्काळ प्रतिसाद देत जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांनी सुमारे दोन एकर प्लॉट स्थानिकांना देण्यासाठी आरक्षित करण्यात येणार असल्याचे सांगितले. यामध्ये मासळी निर्यात, शेतीमाल, फळे, निर्यात करता येऊ शकतील. यासाठी स्थानिक व्यावसायिकांसाठी सेटमध्ये कोल्डस्टोरेजची व्यवस्था जेएनपीटी मार्फत करण्यात येणार आहे.छोटे प्लॉट स्थानिक बाजाराभावापेक्षाही कमी दराने स्थानिकांना देण्यात येतील अशी ग्वाहीही अध्यक्षांनी दिली. तसा ठरावही मंजूर करण्यात आला असल्याची माहिती जेएनपीटी प्रशासनाकडून देण्यात आली.

# राज्यातील गड किल्ल्यांचे पावित्र्य जपत, ऐतिहासिक वारशाला धक्का न लावता किल्ल्यांच्या पायथा परिसरात सुविधा, पर्यटकांसाठी केंद्र उभारा, जैवविविधता जपा

## दुर्गप्रेमी संस्थांच्या प्रतिनिधीसमवेत बैठकीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सूचना

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गडकिल्ले हे महाराष्ट्राचे वैभव असून त्यांचे जतन आणि संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे, मात्र हे काम करताना गडकिल्ल्यांचे पाविव्य जपत, त्याच्या ऐतिहासिक आणि पुरातत्व वारशाला कोणताही धक्का न लावता या किल्ल्यांच्या पायथा परिसरात सुविधा निर्माण कराव्यात व तिथे पर्यटन केंद्र उभारून पर्यटकांना त्या वैभवशाली वारशाची माहिती द्यावी, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज दिल्या. या किल्ल्यांच्या जतन आणि संवर्धनाच्या कामाचे संनियंत्रण मुख्यमंत्री सचिवालयातील संकल्प कक्षातून व्हावे असेही निर्देश त्यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांनी आज दुर्गप्रेमी संस्थांच्या पदाधिकाऱ्यासमवेत दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर सिंह, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, सिद्धीविनायक ट्रस्टचे अध्यक्ष आदेश बांदेकर, दुर्गप्रेमी मिलिंद गुणाजी यांच्यासह अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे अध्यक्ष उमेश झिरपे, ऋषीकेश यादव, भारतीय पुरातत्व खात्याच्या अधिकारी श्रीमती नंदिनी भट्टाचार्य, महाराष्ट्र पुरातत्व खात्याचे अधिकारी, महाराष्ट्रातील गिरीप्रेम क्लबचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.



शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे आणि त्यांच्या ऐतिहासिक विजयाची साक्ष देणारे अनेक गड किल्ले महाराष्ट्रात आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यात पाच किल्ल्यांची निवड करून त्यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शासकीय तसेच इतर तज्ज्ञ लोकांचा सहभाग असलेली, दुर्गप्रेमी आणि अभ्यासकांचा सहभाग असलेली एक मध्यवर्ती समिती स्थापन करा; तसेच निवडलेल्या प्रत्येक किल्ल्यासाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करून या पाचही किल्ल्यांच्या जतन आणि संवर्धनाच्या कामाचे मुख्यमंत्री सचिवालयातील संकल्प कक्षामार्फत संनियंत्रण करा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या.

शिवाजी महाराजांचे एकेकाळचे सोबती, स्वराज्याचे सैनिक असलेल्या गडकिल्ल्यांनी महाराजांचा पराक्रम पाहिला, त्या पराक्रमाचे ते साक्षीदार झाले. त्या किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करणे हे आपले कर्तव्य असून हे काम करतांना गडकिल्ल्यांचे पाविव्य जपत, त्याच्या ऐतिहासिक आणि पुरातत्व वारशाला कोणताही धक्का न लावता आपल्याला हे काम करावयाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी परत एकदा स्पष्ट केले. या किल्ल्यांच्या आजूबाजूच्या ५० कि.मी अंतरामध्ये असलेली पर्यटनस्थळे, किल्ल्याचे ऐतिहासिक संदर्भ, तिथे घडलेला पराक्रम तिथले वन्यजीव, तिथली वनसंपदा,जैव विविधता जोपासावी. आजूबाजूची लोकपरंपरा, गडाच्या अनुषंगाने काही लढाया झाल्या असतील तर त्या, अशा सगळ्या गोष्टींची माहिती संकलित करून गडाच्या पायथ्याशी असलेल्या गावात पर्यटनकेंद्र विकसित करता येईल का, तिथे मूळ गड कसा होता याची प्रतिकृती तयार करता येईल का, पूर्वीचे ते ऐतिहासिक वातावरण निर्माण करता येईल का, लाईट ड साऊंड शो दाखवता येईल का, यादृष्टीने विचार करून एक सर्वंकष विकास आराखडा या समित्यांनी सादर करावा असेही म्हटले.

राज्यातील सर्व किल्ले एका शासकीय विभागांतर्गत आणून त्यांच्या विकासात असलेले अडथळे ताबडतोब दूर करा असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. ते पुढे म्हणाले की, गडकिल्ल्यांवरची स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. गड किल्ल्यांचा विकास करताना त्याचे ऐतिहासिक संदर्भ जपले जाणे, इथे करावयाची डागडुजी ही पुरातत्व खात्याच्या निकषाप्रमाणे होणे गरेजेच आहे. रायगडावर ज्याप्रमाणे पर्यटकांसाठी रोप वे उपलब्ध करून देण्यात आला आहे तो इतर काही गडकिल्ल्यांवर उपलब्ध करून देता येईल का याची शक्यताही मुख्यमंत्र्यांनी तपासून पाहण्यास सांगितली. पावसाळ्यात आपण मोठ्याप्रमाणात वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतो परंतू गडकिल्ल्यांच्या परिसरात हेलिकॉप्टरच्या सहाय्याने बिया टाकल्या तर नैसर्गिकरित्या या भागात वनराई विकसित होण्यास मदत होईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, या सर्व कामात स्थानिकांना विश्वासात घेऊन काम केल्यास गडाच्या पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये पर्यटकांच्या राहण्याच्या, जेवण्याच्या सुविधा उपलब्ध होतील आणि त्यातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार संधी मिळतील, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सभागृहनेते परेश ठाकूर यंदाही वाढदिवस साजरा करणार नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना वैश्विक महामारीचे गांभिर्य लक्षात घेऊन यंदाही वाढदिवस साजरा करणार नसल्याचे पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते व भाजपचे युवानेते परेश ठाकूर यांनी जाहीर केले आहे. १८ मे रोजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचा वाढदिवस असतो. या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. मात्र गेल्या वर्षांपासून कोरोना आजाराचे प्रसार पाहता सार्वजनिक कार्यक्रमांना शासनाने बंदी घातली आहे.



गेल्या सव्वा वर्षांपासून सर्वजण कोविड-१९ या जागतिक संकटाचा सामना करीत आहोत. सर्व स्तरावर त्यावर मात करण्याचे युद्धपातळीवर अविरतपणे प्रयत्न होत आहेत. शासनाने सुद्धा लॉकडाऊनचे कडक निर्बंध सर्वत्र लागू केलेले आहेत. त्यामुळे कोरोनाचा प्रसार पाहता यंदा वाढदिवस न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र वाढदिवसाच्या निमित्ताने ०६ जून रोजी पनवेल परिसरात किमान ०१ हजार वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे.

यावेळी परेश ठाकूर यांनी आवाहन केले की, कोविड महामारीचे गांभिर्य लक्षात घेऊन यंदा वाढदिवस साजरा करणार नाही. कोणीही, कोठेही आणि कोणत्याही स्वरूपात माझा वाढदिवस साजरा करू नये, तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्याची तसदी घेऊ नये. स्वतःची व कुटुंबाची आणि सार्वजनिक आरोग्याची काळजी घ्यावी. आणि देशाला कोरोनामुक्त करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पोलिसांनी केली गावठी दारु हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील भंगारपाडा परिसरातून गुन्हे शाखा कक्ष २ व पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने गावठी दारुचा साठा हस्तगत केला आहे.

या ठिकाणी एका घराच्या पाठीमागे हातभट्टीची दारु, कॅन, व इतर साहित्य ठेवण्यात येवून त्याची विक्री होत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल व पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्यांच्या विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा मारुन जवळपास ८५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात २१ कोरोना पॉझिटीव्ह, तर एक मुत्यू

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील शनिवार १५ मे रोजी मिळालेल्या कोरोना चाचणी अहवाल नुसार तालुक्यात २१ रुग्णांची वाढ झाली आहे. तर एकाचा मुत्यु झाला आहे.

यामध्ये श्रीवर्धन शहर परिसरातील १०, दिवेआगर ४, बोर्लीपंचतन ३, रानवली २ तर वडवली, जसवली येथील प्रत्येकी १ रुग्णांचा रिपोर्ट पॉजेटीव्ह आला आहे. तालुक्यातील शनिवार रोजी मिळालेल्या कोरोना चाचणी अहवालानुसार २१ रुग्ण संख्या वाढली असून आता बाधित रुग्णांची एकूण संख्या ८१८ झाली आहे. यातील ३७ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह होऊन दगावले आहेत. तर ६५३ रुग्ण कोरोनावर मात करुन बरे झाले आहेत. सद्या १२८ रुग्ण उपचार घेत आहेत.

## जास्त ट्रीप मारल्याचा राग धरुन तीघांनी केली एका इसमास मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तुझ्याच का जास्त ट्रीप होतात, तुझ्यामुळे आमच्या ट्रीप कमी होतात असे बोलून एका चालकाला त्याच्या तिघा सहकाऱ्यांनी नाहक शिवीगाळ करून वाद करून त्याला लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्याने मारहाण केल्याची घटना सोमटणे गावाच्या हद्दीत घडली आहे.

या ठिकाणी असलेल्या नवकार कॉर्पोरेशन लि.कंपनीच्या आवारात शहाजी हटकर (४५) हे कंपनीत ड्रायव्हर म्हणून काम करतात. यावेळी हे त्यांच्या गाडीत आराम करीत असताना आरोपी लिंगप्पा सरगर, रोहित सरगर व एक अनोळखी इसम ते त्या ठिकाणी येवून तुझ्याच का जास्त ट्रीप होतात, तुझ्यामुळे आमच्या ट्रीप कमी होतात असे बोलून त्यानंतर शहाजी हटकर चहा पिण्यासाठी कंपनीच्या गेटकडे निघाले असताना या तिघांनी आपसात संगनमत करून त्यांच्या पाठीमागे पळत जावून त्यांच्या हातातील लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांना दुखापत केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# 'एलअॅण्डटी'ने केली पोलादपूरची वाट बिकट; पावसाळ्यात होणार कशेडी घाटरस्ताही चिकट!

## लालमातीचे ढिगारे रस्त्यावर कोसळून पर्यायी रस्ता सज्ज करण्याची गरज

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ची ठेकेदार कंपनी 'एलअॅण्डटी'चे प्रोजेक्ट मॅनेजर जगमोहन नायडू यांनी महाड तालुक्यातील वीर ते पोलादपूर तालुक्यातील कातळी भोगावपर्यंतच्या रस्त्याचे अंतिम टप्प्यात आल्याचा दावा करून नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडियाकडे येत्या डिसेंबर २०२१ पर्यंत काम सोपविण्याची माहिती नुकतीच दिली आहे. मात्र, पोलादपूर शहरातील अंडरपास रस्ता आणि सर्व्हिस रोडची सद्यस्थिती पाहता १५ जूनपर्यंत पावसाने हजेरी लावली तरी डोंगराची लालमाती सर्व्हिसरोडवर आणि अंडरपास रोडसाठीच्या बॉक्सकटींगची माती भूमिगत रस्त्यांमध्ये शिरून राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूकीचा प्रचंड प्रमाणात खोळंबा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



पोलादपूर शहरातील श्रीकाळभैरवनाथ देवस्थानासमोरून अंडरपास होण्यास सुरूवात झालेल्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे सडवली फाट्यापर्यंत अंडरपास स्वरूप असून यादरम्यान पोलादपूर पंचायत समिती कार्यालयासमोरून बॉक्स कटींग मोठ्याप्रमाणात होऊन भुमिगत सिमेंट काँक्रीटचा बॉक्स भुयारी मार्ग तयार करण्यात येत आहे. यादरम्यान सर्व्हिस रोड रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिराच्या उंच टेकडीजवळून पुढील दुकानांपर्यंत काँक्रीटची संरक्षक भिंत बांधण्याचे काम अर्धेअधिक पूर्ण झाले आहे. ही काँक्रीटची संरक्षक भिंत उभारण्यामागे जसा लालमातीचा ढिगारा सर्व्हिसरोडवर कोसळू नये, हा हेतू आहे; तो हेतू कशेडी घाटातील उंच व सरळ कापलेल्या डोंगरटेकड्यांतून लालमातीचे ढिगारे गेल्या सलग दोन वर्षांत कोसळूनही तिथे विचारात घेण्यात आलेला नाही. याखेरिज, बॉक्सकटींग करून अंडरपास रस्त्यासाठी सुरू असलेल्या कामादरम्यान महामार्गावरील वाहतूक सद्यस्थितीत सुरू असलेल्या सर्व्हिस रोडवरून होत असल्याने अंडरपाससाठी खोदलेल्या खंदकाला काँक्रीटची भिंत उभारून सर्व्हिसरोड या खंदकांमध्ये ढासळून वाहतूक ठप्प होईल हा विचार करण्यात आलेला नाही.

'एलअॅण्डटी'कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर जगमोहन नायडू यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'एलअॅण्डटी'कंपनीच्या ठेकेदारीतील सुमारे ३९ किमी अंतराच्या रस्त्यापैकी ६५ टक्के काम पूर्ण झाले असून काही जागांना वनखात्याची परवानगी मिळाली नाही तर काहीठिकाणी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही अशी परिस्थिती आहे. मात्र, पोलादपूर शहरातील भूसंपादनाचा मोबदला घेऊनही काही जणांनी इमारती व जमिनींचा ताबा न सोडल्याने पश्चिमेकडील सर्व्हिस रोड पूर्ण होण्यास पोलादपूर एस.टी.बस स्थानकासमोर अडथळा निर्माण झाला आहे. काहींना संपादनामध्ये येणाऱ्या भूभागावरील इमारतीऐवजी संपूर्ण इमारतीचा मोबदला इमारतीचा ताबा न देता अपेक्षित असून त्यांनीही पश्चिमेकडील सर्व्हिसरोड पूर्ण करण्यास अडथळा निर्माण केला आहे.


'एलअॅण्डटी'कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर जगमोहन नायडू यांनी अलिकडेच त्यांना भेटण्यास गेलेल्या पत्रकारांना माहिती दिली. यावेळी कोणतेही प्रतिप्रश्न न विचारण्यात आल्याने पोलादपूर शहरातील बॉक्सकटींग स्वरूपाचा अंडरपास रस्ता आणि कशेडी घाटरस्ता यंदा पावसाळ्यात लालमातीचे ढिगारे रस्त्यावर कोसळून पर्यायी रस्ता सज्ज करण्याची गरज निर्माण होणार असल्याकडे चर्चेदरम्यान सपशेल दूर्लक्ष झाले आहे. त्यामुळे कशेडी घाटरस्ताही लालमातीमुळे चिकट होऊन पोलादपूरची वाट 'एलअॅण्डटी'ने बिकट केल्याचा उहापोह होऊ शकला नाही.

स्थानिक आणि 'एलअॅण्डटी'कंपनीच्या संघर्षामध्ये पोलादपूर शहरात तर 'एलअॅण्डटी'कंपनीच्या नियोजनाअभावी कशेडी घाटातील रस्त्यावर आगामी पावसाळ्यामध्ये गेल्या चार वर्षांप्रमाणे मोठ्या प्रमाणात लालमातीचे ढिगारे कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, या संभाव्य आपत्तीमागे नियोजनाचा अभाव असूनही या समस्येकडे गांभिर्याने न पाहता नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडियाकडे येत्या डिसेंबर २०२१ पर्यंत काम पूर्ण करून सोपविण्याची माहिती देण्यामागे 'एलअॅण्डटी'कंपनीच्या प्रोजेक्ट मॅनेजर जगमोहन नायडू यांचा काय सुप्त हेतू असावा, याचा अंदाज लागत नाही. मात्र, यामुळे कशेडी घाटाला पर्यायी रस्ता गेल्यावर्षीप्रमाणे विन्हेरे तुळशीखिंडमार्गे सज्ज ठेवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

# निसर्ग पेक्षा ताउक्ते चक्रीवादळाच्या वेगाचीच चर्चा आणि दहशत

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

भारतीय हवामान विभाग निर्देशित सुचनेनुसार पूर्वमध्य अरबी समुद्रात वादळ सदृश्य स्थिती मुळे समुद्र किनारपट्टी व खाडीलगतच्या भागात मोठ्या प्रमाणात वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्या अनुषंगाने दि. १६ व १७ मे रोजी रायगड जिल्ह्यातही ४० ते ६० किमी वेगाने वारे वाहणार असल्याने समुद्र खवळलेल्या स्थितीत राहणार आहे. हिंद महासागरातुन अरबी समुद्राकडे आलेले ताउक्ते चक्रीवादळा मुळे (Cyclone Tauktae) रायगड जिल्ह्यात वादळ सदृश्य स्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात आली आहे. लोकांमध्ये या वादळाच्या वेगाचीच जास्त चर्चा ऐकावयास मिळत आहे.



वेगवेगळे अंदाज व्यक्त होत आहेत. काही नामांकित इंग्रजी दैनिकातुन ताशी १७५ किमी वेगाने वारे वाहणार असल्याचे म्हटले आहे. तत्कालिन निसर्ग चक्रीवादळाचा वेग ताशी १२० किमी सांगण्यात आला होता पण प्रत्यक्षात मात्र तो १४० किमी इतका होता. आजही त्या आठवणीने अंगावर काटा उभा राहतो. घोंगावणारा चित्कारणारा वारा आणि खेळाच्या पत्त्यांप्रमाणे घरांवरील इमारतीवरील पत्रे छप्पर उडुन झालेले नुकसान, शेकडो वर्षांचे महाकाय वृक्ष उन्मळुन पडले, माडाची झाड अर्धवट मोडली. माड-सुपारीच्या बागा उध्दवस्त झाल्या होत्या. संपूर्ण महावितरण व्यवस्था कोलमडली वीजेच पोल वाकले, पिळले तारा मोडल्या अनेक दिवस गावच्यागाव अंधारात गेली.

त्या प्रचंड वेगाने माणसाचे मनात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. सर्वत्र या वेगाचीच चर्चा आहे, सोशल माध्यंमावर काल झालेल्या वादळ पाऊसाची छायाचित्र फिरत आहेत. जराश्या वादळाने पत्रे उडाले झाडांच्या फांद्या पडल्या पाऊस पडला हे पाहता लोकांच्या मनात उद्याच्या वादळाचे काहुर माजले आहे. रात्रीचे वादळ झाले तर काय अवस्था होईल याची मनात भिती आहे. शासनाच्या पूर्व सुचना, हाय लर्ट संदेश सर्वत्र फिरत आहेत.

दोन दिवस ढगाळ वातावरण आहे. शुक्रवारी रात्री तासभर पाऊस पडला मात्र अचानक पडलेल्या पावसामुळे प्रचंड उष्णता वाढली आणि त्यातच काही काळ वीज खंडीत झाली. माणसाचे जीवन त्रस्त झाले आहे. वादळाच्या भितीने लोक आवश्यक साहित्य व लाईट गेल्यास तात्पुरत्या तयारीस लागले आहेत.

# माजी तालुकाप्रमुख विष्णू ठाकूर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेनेचे ड्रसिंग नेते तथा माजी उरण तालुका प्रमुख विष्णू ठाकूर यांचे बुधवार दि१२ मे २०२१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.मुत्यू समयी त्याचे वय ६३वर्ष होते. त्याच्या देहावर चिरनेर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

विष्णू ठाकूर यांचा जन्म चिरनेर या गावातील सर्व सामान्य कुटुंबात झाला होता.ते एक उत्कृष्ट क्रिकेट पटू होते.मा. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावर त्याची अपार श्रद्धा होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर पेरीत होऊन त्यांनी शिवसेनेचा झेंडा आपल्या हाती घेऊन औद्योगिक दुष्ट्या विकसित असलेल्या रसायनी परिसरात उरण, रसायनी परिसरातील अनेक गोर गरीब तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम केले.एक ड्रसिंग युवा नेतूत्व म्हणून शिवसेनेचे तत्कालीन नेते गणेशजी नाईक यांनी त्यांना उरण तालुक्यातील शिवसैनिकांच्या आग्रह खातर तालुक्याचे नेतृत्व करणाऱ्यांसाठी उरण तालुका प्रमुख पदांची जबाबदारी दिली होती. अशा लढवय्या नेतूत्वाचा वयाच्या ६३ व्या वर्षी चिरनेर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. यावेळी अनेक राजकीय पक्षांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शोक व्यक्त केला आहे.

# सातार्‍यातील ज्वेलर्स मालकाकडून १ कोटी ४३ लाख रुपये उकळणार्‍या महिलेचा शोध सुरु

## आरोपी महिलेने १५ पेक्षा अधिक व्यक्तींना कोट्यवधी रुपयांना गंडा घातल्याचे उघड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रच नव्हे तर जम्मू काश्मिरसह इतर राज्यातील व्यक्तींना तसेच चांगल्या पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तींना कोट्यवधी रुपयांना गंडा घालणाऱ्या माधवी सुहास चव्हाण उर्फ माधवी ढेंबे (३१) या महिलेने सातारा येथील एका ज्वेलर्स मालकाला स्वस्तात सोने देण्याच्या बहाण्याने तब्बल १ कोटी ४३ लाख रुपये उकळल्याचे उघडकिस आले आहे.

नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने माधवी ढेंबे विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन तिचा शोध सुरु केला आहे. दरम्यान, माधवी ढेंबे या महिलेने मागील काही वर्षामध्ये १५ पेक्षा अधिक व्यक्तींची अशाच पद्धतीने फसवणुक करुन त्यांच्याकडून १० कोटी पेक्षा अधिकची रक्कम उकळल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात फसवणुक झालेले ज्वेलर्स मालकाचे सातारा येथील नागठाणे येथे दुकान आहे. २०१९ मध्ये त्यांच्याकडे दागिने खरेदी करण्यासाठी आलेल्या अमोल बडेकर याने कळंबोली येथे राहणारी माधवी सुहास चव्हाण ही महिला कस्टममध्ये अधिकारी असल्याचे तसेच ती कस्टम मधुन सोने आणुन ते मुंबईतील प्रतिष्ठित ज्वेलर्सच्या माध्यमातून बिलासहित स्वस्तात देत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर अमोल बडेकर व विशाल गायकवाड या दोघांनी ज्वेलर्स मालकाची माधवी चव्हाणसोबत कळंबोली येथे भेट देखील घडवून दिली होती. त्यानंतर माधवी चव्हाण उर्फ माधवी ढेंबे हिने १२. ४ किलो वजनाची सोन्याची विट ज्वेलर्स मालकाला दाखवून त्यातील काही सोने स्वस्तात देण्याचा बहाणा करुन ज्वेलर्स मालकाकडून तब्बल १ कोटी ४३ लाख रुपये उकळले. मात्र त्यानंतर माधवी ढेंबे हिने त्यांना सोने देण्यास टाळाटाळ केली होती. त्यावेळी माधवी ढेंबे व दादर येथील रमेश ज्वेलर्सचा मालक रमेश जैन या दोघांनी दिवाळी नंतर सोने देण्याचे आश्वासन ज्वेलर्स मालकाला दिले होते. मात्र त्यांनी सोने न दिल्याने सातारा येथील ज्वेलर्स मालकाने माधवी ढेंबे हिची माहिती काढली असता, ती कस्मटमध्ये अधिकारी नसल्याचे तसेच तिने अनेकांना कोट्यावधीचा गंडा घातल्याचे त्यांना समजले. त्यानंतर त्यांनी नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक ग्रहे शाखा युनिट-२ कडे धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेने माधवी ढेंबे व रमेश जैन या दोघां विरोधात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन तिचा शोध सुरु केला आहे.

माधवीने नवी मुंबईत देखील अनेकांना कोट्यावधींचा चुना लावला आहे. यात वाशीत डान्स क्लास चालविणाऱ्या सोनल साखरे हिला देखील तीने कस्टममधून मिळणारी सोन्याची नाणी कमी किंमतीत विकत देण्याचे अमिष दाखवून तीच्याकडून तब्बल ९५ लाख रुपये उकळले आहेत. त्यामुळे नवी मुंबई गुन्हे शाखेने तीला २०१६ मध्ये अटक केली होती. त्यानंतर तीने कोपरखैरणे येथे राहणाऱ्या वासुदेव शिरसाठ या टॅक्सी चालकाला चार लाख तसेच वाशीत राहणारे चंद्रकांत पाळसे यांच्याकडून २० लाख रुपये, मुंबईतील मोहम्मद अस्लम सोफा यांच्याकडून १ लाख ८९ हजार रुपये उकळले आहेत. तसेच तीने नांदेड येथील सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय करणाऱ्या उल्हास रेखापार यांना कमी किंमतीत दोन किलो सोने देण्याचे अमिष दाखवुन त्यांच्याकडून तब्बल ३४ लाख रुपये उकळले आहेत.

माधवीने जम्मु काश्मिर मध्ये देखील अशाच पद्धतीने फसवणुक केली असून जम्मु-काश्मिर पोलिसांनी तीच्या विरोधात अटक वारंट काढून तीला अटक केली होती. माधवीने ब्लॅक मनी बाळगणाऱ्या मुंबई व नवी मुंबईतील अनेक व्यक्तींना त्यांचा काळा पैसा सोन्यात गुंतविण्याचा सल्ला देऊन त्यांना कस्टमकडून पकण्यात आलेले सोने कमी किंमतीत देण्याचे अमिष दाखविल्याचे देखील तपासात आढळून आले आहे. तीच्या या अमिषाला बळी पडून अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींनी व काही नगरसेवकांनी तिच्याकडून कमी किंमतीत सोने विकत घेण्यासाठी तीला कोट्यवधी रुपये दिल्याचे देखील निष्पन्न झाले आहे. बदनामीच्या भीतीने व माधवीला देण्यात आलेल्या रक्कमेचा तपशील उघड होईल या भितीने अनेकांनी माधवी विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार करण्याऐवजी गप्प राहणे पसंत केल्याचे बोलले जात आहे.

# रोहा तालुक्यात भात कापणी, बांधणी व झोडणीला सुरुवात

## भात कापणीच्या कामात पावसाचे सावट

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील भात पीक अंतिम टप्यात आले असून या विभागातील भातशेती कापण्यासाठी सुरुवात झाली असुन याच दरम्यान पावसाचे वातावरण निर्माण झाले असून काही ठिकाणी तुरलक प्रमाणात पासुन पडत भात शेती कापण्यासाठी पडत असल्यामुळे बळीराजाच्या चिंता वाढलेली दिसत आहे.

रोहा तालुक्यातील उन्हाळी हंगातील शेती ही कोलाड पाटबंधारे विभाग यांच्या मार्फत डोळवहाल धरणामधून कळव्या मार्फत सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा आधारे डिसेंबर ते मे महिन्या अखेर केली जात असुन या साठी शेतकरी वर्गाला अतिशय कठोर मेहनत घ्यावी लागते.या वर्षीही भात पीक चांगले आहे असुन भात कापणीला सुरवात करण्यात आली परंतु १४ मे ते १६ मे पर्यंत कोकणात चक्री वादळाचा अंदाज दिला असुन महाड परिसरात काळ १४ मे रोजी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला असुन असाच पाऊस पडला तर हातातोंडाशी आलेल्या पिकाचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या वर्षीही रोहा तालुक्यात भाताचे पीक उत्तम प्रकारे येऊन तुफान पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या वर्षी ही भात पीक चांगले आले असुन ते कापणी,बांधणी, झोडणी साठी जोरदार सुरवात झाली आहे परंतु अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अजून दहा ते पंधरा दिवस पाऊस लांबला तरच सर्व पीक कापून, बांधून, झोडून सुखरूप पुर्ण होईल असे शेताकरी वर्गातून बोलले जात आहे.

